आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद

## School Leadership Academy, Maharashtra

## मोड्यूल क्र.२३

## “अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांना तंत्रस्नेही बनविण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका.”

## The Role of School Leadership in Making Students Technology Friendly in Remote Areas




मानवाला आपल्या पूर्ण क्षमता वापरता येण्यासाठी आणि त्यातून राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण हा महत्वाचा पाया आहे.व्यक्ती,समाज,देश आणि जगाच्या हितासाठी आपल्या देशातील समृध्द प्रतिभा आणि संसाधनाचा पुरेपूर वापर करण्याकरीता उच्च दर्जाचे सार्वभौम शिक्षण हा सुरक्षित भविष्यासाठी सर्वात चांगला मार्ग आहे.पुढच्या दशकात जगातील सर्वात मोठी युवकांची लोकसंख्या भारतामध्ये असेल आणि त्या

सर्वांना चांगल्या गुणवत्तेच्या शिक्षणाच्या संधी पुरविण्याच्या आपल्या क्षमतेवर आपल्या समृद्ध देशाचे भवितव्य अवलंबून असेल.

भारताने २०१५ मध्ये स्वीकारलेल्या शाश्वत विकासाच्या २०३० च्या कृती कार्यक्रमाच्या उद्दिष्ट ४ मध्ये जागतिक शिक्षण विकास कृती कार्यक्रम समाविष्ट आहे. या कृती कार्यक्रमाचे उद्दिष्ट "सर्वांसाठी समावेशक आणि समान गुणवत्तेचे शिक्षण सुनिश्चित करणे आणि सर्वांसाठी निरंतर अध्ययनाच्या शिक्षणाच्या संधींना प्रोत्साहन देणे" हे २०३० पर्यंत पूर्ण करावयाचे आहे. या उत्तुंग उद्दिष्ट साध्यतेसाठी शिक्षण प्रणालीची रचना तितकीच प्रभावी असणे महत्वाचे आहे.

ज्ञानाच्या बाबतीत जगामध्ये वेगाने बदल होत आहे. बिग डेटा, मशीन लर्निंग, कृत्रिम बुद्धिमत्ता यासारख्या विज्ञानाच्या आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये वेगाने होत असलेल्या विकासामुळे मुलांना केवळ शिकणे महत्वाचे नाही तर कसे शिकायचे हे शिकणे जास्त महत्वाचे आहे. त्यामुळे शिक्षकांनी फक्त मजकुरावर लक्ष न देता तार्किक विचार कसा करायचा, समस्या कशा सोडवायच्या, कल्पक आणि बहुशाखीय कसे व्हायचे,नाविन्यपूर्ण परिस्थितीशी समायोजन साधत कसे शिकायचे हा दृष्टीकोन विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे गरजेचे आहे. शिक्षण अधिक अनुभवात्मक, सर्वसमावेशक, एकात्मिक, जिज्ञासू, संशोधन केंद्रित, लवचिक आणि अर्थात आनंददायी होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत.

## शिक्षण व तंत्रज्ञान-

माहिती व संचार तंत्रज्ञान आणि इतर अत्याधुनिक क्षेत्रात भारत जागतिक पातळीवर नेतृत्व करीत आहे.डिजिटल भारत मोहिमेमुळे संपूर्ण राष्ट्राचे डिजिटल दृष्ट्या सक्षम आणि ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेमध्ये रुपांतर व्हायला मदत होत आहे.या रूपांतरणामध्ये शिक्षणाचा महत्वपूर्ण हातभार आहे.१८६/१९९२ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये इंटरनेटमुळे घडू शकणाऱ्या क्रांतिकारी बदलांच्या परिणामांचा अंदाज करण्यात आलेला नव्हता. पण बदलत्या जगाच्या पार्श्वभूमीवर तंत्रज्ञानातील हे परिवर्तन सर्वांना आश्चर्यचकित करणारे ठरलेले आहे. कल्पनेतही नसलेले क्रांतिकारी बदल झालेलं जग आपल्या पुढ्यात तंत्रज्ञानाने उभे केले आहे.तंत्रज्ञान वापराचा मुख्य उद्देश प्रामुख्याने अध्यापन - अध्ययन आणि मुल्यांकन प्रक्रियेत सुधारणा घडवून आणणे हा आहे. शिक्षकांच्या तयारीस आणि व्यावसायिकांच्या विकासास सहाय्य करणे, शिक्षणाची उपलब्धता वाढविणे आणि प्रवेश, उपस्थिती इत्यादींशी संबंधित शैक्षणिक नियोजन, प्रशासन, व व्यवस्थापन सुलभ करणे यासाठी सुद्धा तंत्रज्ञानाचा उपयोग मोठ्या प्रमाणात केला जात आहे. या सर्व उद्दिष्टांसाठी अनेक प्रकारची शैक्षणिक सॉफ्टवेअर विकसित केली आहेत. त्याच्या मदतीने सर्व स्तरातील विद्यार्थी, शिक्षक आपले अध्ययन अध्यापन कार्य सुलभपणे करीत आहेत .NCERT,CIET,CBSE,NIOS आणि इतर काही संस्थांनी सर्व प्रमुख भारतीय भाषांमध्ये अध्ययन अध्यापन कामात उपयोगी ई-साहित्याची निर्मिती करून विविध प्लॅटफॉर्मवर अपलोड केले आहे. DIKSHA हा त्यातील प्रमुख व महत्वाचा स्रोत आहे. खाजगी शाळांच्या सोबतच आता बहुतेक शासकीय शाळांमध्ये सुद्धा तंत्रज्ञानाची विविध साधने उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. ज्याच्या मदतीने शिक्षक अध्ययन अध्यापन प्रक्रिया अधिक प्रभावीपणे व परिणामकारकरित्या पूर्ण करीत आहेत. अतिशय दुर्गम भागातील विद्यार्थी सुद्धा तंत्रज्ञानाची कास



धरीत आपला विकास उत्कृष्ट पद्धतीने कसा साधू शकतात हे आपण या मोड्यूलमधून अभ्यासणार आहे.

## मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे-

१. शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचे महत्व समजून घेणे.
२. दुर्गम भागातील मुख्याध्यापकांनी अध्ययन अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा केलेला उपयोग समजून घेणे.
३. अध्ययन अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा कौशल्यपूर्ण उपयोग करण्याबाबतचा शालेय नेतृत्वाचा दृष्टीकोन विकसित करणे.

## ऑनलाईन आणि डिजिटल शिक्षण-

कालपरत्वे बदलणाऱ्या नव्या परिस्थिती आणि वास्तविकता यांचा मेळ घालायचा असल्यास शैक्षणिक क्षेत्रात नवनवीन उपक्रमांची गरज भासत असते.सध्या वाढत असलेले साथीचे व महामारीच्या रोगांचा विचार करता जेव्हा कधी आणि जिथे कुठे पारंपारिक आणि प्रत्यक्ष शिकविण्याच्या माध्यमांचा वापर शक्य नसेल तेव्हा दर्जेदार शिक्षणाची पर्यायी माध्यमे तयार ठेवणे गरजेचे झाले आहे. या संदर्भात तंत्रज्ञानामुळे मिळणाऱ्या फायद्याचा लाभ घेण्याचे महत्व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ने सुद्धा मान्य केलेले आहे.ऑनलाईन शिक्षणातील तोटे,धोके दूर करीत किंवा त्यांचे निराकरण करीत शिक्षणामध्ये त्याचे फायदे कसे मिळविता येतील याचा विचार या शैक्षणिक धोरणात नियोजनपूर्वक करण्यात आलेला आहे.सर्वांसाठी दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी वर्तमान आणि भविष्यातील आव्हानांचा सामना करण्याकरिता विद्यमान डिजिटल प्लॅटफॉर्म आणि ICT आधारित शैक्षणिक उपक्रमांचा दर्जा वाढवा व सर्वदूर त्याचा विस्तार व्हावा म्हणून नियोजनबध्द प्रयत्न शालेय शिक्षण विभागा मार्फत करण्यात येत आहेत. डिजिटल भारत मोहीम आणि सर्वांना परवडणाऱ्या तंत्रज्ञानाच्या साधनांची उपलब्धता यामधील डिजिटल दरी जोपर्यंत भरून निघत नाही तोपर्यंत डिजिटल शिक्षणाच्या फायद्यांचा तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत लाभ होणे शक्य नाही.

ऑनलाईन शिक्षण देण्यासाठी शिक्षकांना योग्य ते प्रशिक्षण देण्याची गरज आहे. पारंपारिक वर्गातील एक चांगला शिक्षक ऑनलाईन वर्गात देखील तेवढीच उत्तम कामगिरी करेलच असे म्हणता येणार नाही. त्यासाठी त्याला तांत्रिक माहिती व कौशल्य आत्मसात करणे गरजेचे असते. तेव्हाच हे तंत्रज्ञानाचे शस्त्र ते यशस्वीरीत्या हाताळू शकतात. शिवाय ऑनलाईन शिक्षण आणि अनुभवाधारित शिक्षण यांचा मेळ घालणे सुद्धा अवघड गोष्ट आहे. हे जोपर्यंत साधल्या जात नाही तोपर्यंत असे शिक्षण फक्त स्क्रीन आधारित शिक्षण बनण्याची शक्यता आहे. ज्यात अध्यनार्थीच्या सामाजिक, भावनात्मक, मानसिक व कारक पैलूंकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. या सर्व बाबींचा विचार करीत डिजिटल तंत्रज्ञानाचा उदय आणि शाळेपासून उच्च शिक्षणापर्यंत सर्व स्तरावर अध्ययन - अध्यापनासाठी तंत्रज्ञानाचा फायदा करून घेण्याचे महत्व लक्षात घेता राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये खालील काही उपक्रमांची शिफारस केलेली आहे. शिक्षणक्षेत्रातील प्रत्येक व्यक्तीला विशेषतः शालेय नेतृत्वाला याबाबत माहिती असणे महत्वाचे ठरणारे आहे.

## ऑनलाईन शिक्षणासाठी पथदर्शी अभ्यास-

सामान्य शिक्षणाचे ऑनलाईन शिक्षणासोबत एकात्मीकरण करण्यासाठी आणि या शिक्षणातील दोष कमी करण्याकरीता CIET, NIOS, IGNOU, IITs, NITs इत्यादी संस्थावर जबाबदारी सोपविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना उपकरणाची सवय लागावी, अध्ययन अध्यापन प्रक्रियेत उपयुक्त ई-साहित्याची निवड करता यावी यासाठी सर्वप्रथम पथदर्शक अभ्यासाची मालिका आयोजित करण्याबाबतचे आणि या अभ्यासात मिळालेल्या निकालातून याप्रकारच्या शिक्षण प्रक्रियेत सुधारणा करण्याबाबत सुचविण्यात आले आहे.

## डिजिटल पायाभूत सुविधा-

भारताचा भौगोलिकदृष्ट्या व्यापक विस्तार व विविधता, देशाची आर्थिक,सामाजिक परिस्थिती आणि डिजिटल साधनाची उपलब्धता व उपयुक्तता या सर्वांचा विचार करता एकाहून अधिक प्लॅटफॉर्म वापरता येतील अशा विकसनक्षम सार्वजनिक डिजिटल पायाभूत सुविधा शिक्षण क्षेत्रात निर्माण करण्याचे प्रयत्न या पुढील काळात करण्यात येणार आहे. यामुळे तंत्रज्ञानाच्या वेगवान प्रगती सोबतच तंत्रज्ञान आधारित शिक्षण टिकण्यास, विकसित होण्यात निश्चितच मदत होईल.

## ऑनलाईन अध्यापन प्लॅटफॉर्म आणि साधने-

कोविड-१९ सारख्या महामारीने ऑनलाईन वर्ग घेण्यासाठी डिजिटल साधने काळाची गरज आहे हे दर्शवून दिले आहे.त्यामुळे या पुढील काळात शिक्षण प्रक्रियेत डिजिटल साधनाची पर्याप्त उपलब्धता आणि त्यांचा सहज वापर या सर्वाची तयारी करून ठेवणे गरजेचे आहे. शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर नजर ठेवण्यासाठी, तसेच अध्ययन-अध्यापन प्रक्रिया सहज, सोपी पण परिणामकारक व्हावी यासाठी DIKSHA, SWAYAM अशा ई-अध्ययन प्लॅटफॉर्मचा विस्तार करण्याची पण गरज भासणार आहे.

## मजकूर निर्मिती,डिजिटल भांडार आणि प्रसार-

ऑनलाईन अध्यापन करण्यासाठी ई- साहित्याचे डिजिटल भांडार विकसित करण्याची गरज आहे. हे ई- साहित्य वापरण्यास सुलभ तसेच विविध भारतीय भाषांमध्ये असणे आवश्यक आहे. या ई- साहित्याची निर्मिती करण्याकरिता पारंपारिक शिक्षकांना प्रशिक्षित करून त्यांच्याकडूनच विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार ई-साहित्याचे डिजिटल भांडार विकसित करून घेणे आणि त्याचा विद्यार्थ्यांपर्यंत प्रसार करणे गरजेचे असणार आहे. त्यासाठी शिक्षण विभागा मार्फत नियोजित प्रयत्न येणाऱ्या काळात करण्यात येतील .

## डिजिटल दरी कमी करणे-

भारतात अत्यंत मर्यादित डिजिटल सुविधा उपलब्ध असलेला लोकसंख्येचा एक मोठा वर्ग अस्तित्वात आहे.हे वास्तव लक्षात घेता दूरदर्शन, रेडीओ अशा विद्यमान प्रसारमाध्यमांचा शैक्षणिक बाबींचे प्रसारण करण्याकरिता प्रभावी वापर करण्यात येत आहे. यापुढील काळात या प्रसारमाध्यमांचा उपयोग प्रभावीपणे व परिणामकारक व्हावा म्हणून नियोजित प्रयत्न करणे गरजेचे असणार आहे.या माध्यमातून होणारे विविध कार्यक्रम सर्व प्रादेशिक भाषेतून २४/७ उपलब्ध करून देण्याचे नियोजन सध्या शिक्षण विभागामार्फत करण्यात येत आहे.

## व्हर्च्युअल प्रयोगशाळा-

व्हर्च्युअल प्रयोगशाळा तयार करण्यासाठी DIKSHA,SWAYAM आणि SWYAMPRABHA या सारख्या विद्यमान ई- लर्निंग platform चा उपयोग करण्याचे नियोजित आहे.जेणेकरून सर्व विद्यार्थ्यांना दर्जेदार प्रत्यक्ष प्रयोग आधारित अध्ययन अध्यापन प्रक्रियेत सहभागी होता येईल.आधीच मजकूर लोड असलेले टॅबलेट वापरून विद्यार्थी व शिक्षक यांना सोयीस्कर होतील अशा सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

## शिक्षकांना प्रशिक्षण व प्रोत्साहन-

ऑनलाईन शिक्षण प्रक्रियेचा उपयोग करण्यासाठी उच्च दर्जाचे ऑनलाईन मजकूर तयार करणे व विद्यार्थी केंद्रित अध्यापन पद्धतीचा उपयोग करण्यासाठी शिक्षकांना प्रभावी प्रशिक्षण देण्याची अत्यंत गरज आहे. त्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्या मार्फत नियोजन करून सर्वसामान्य शिक्षक तंत्रस्नेही व्हावे यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक असेल. ई-साहित्य निर्मिती सोबतच विद्यार्थी-शिक्षक, विद्यार्थी - विद्यार्थी आंतर्क्रिया अधिक सुलभ करण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहे.

## अध्ययनाचे मिश्र मॉडेल-

डिजिटल अध्ययन-अध्यापन प्रक्रिया आणि समोरासमोर प्रत्यक्ष अध्ययनाचे महत्व लक्षात घेता विविध विषया नुसार मिश्र अध्ययन-अध्यापनाची विविध परिणामकारक मॉडेल विकसित करणे महत्वाचे असणार आहे.

## मानके निश्चित करणे-

ऑनलाईन आणि डिजिटल शिक्षणाबद्दलचे संशोधन होईल तसे NETF आणि संबंधित संस्था ऑनलाईन आणि डिजिटल शिक्षणासंबंधी आशय,तंत्रज्ञान आणि अध्यापनशास्त्र यांची मानके निश्चित करतील.ही मानके राज्य, बोर्ड, शाळा आणि शाळा संकुल इत्यादीसाठी ई- शिक्षणाची मार्गदर्शक तत्वे तयार करण्यासाठी मदत करणारी असणार आहे.

शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर हे केवळ साध्य नाही तर तों एक प्रवास आहे.या प्रवासाची उद्दिष्टे साध्य करावयाची असल्यास विविध घटकांनी एकत्रित येऊन प्रयत्न करणे गरजेचे आहे. डिजिटल पायाभूत सुविधा, डिजिटल सामुग्री, आणि या सर्वाचा कौशल्याने वापर करता येणारे मनुष्यबळ आणि या सर्वांचा समन्वय योग्य पद्धतीने साधता यावा म्हणून मंत्रालयीन स्तरावर एखादा कक्ष निर्माण करण्याची गरज असणार आहे. तंत्रज्ञानाच्या परिवर्तनाचा वेग प्रचंड आहे आज निर्माण झालेली गोष्ट उद्या कालबाह्य ठरत आहे. या जलदगतीने होणाऱ्या बदलाबरोबर उत्क्रांत होण्यासाठी शिक्षक विद्यार्थी यांना प्रशासन,शिक्षण,शैक्षणिक तंत्रज्ञान,डिजिटल अध्यापनशास्त्र याबाबतीत मार्गदर्शन करण्यासाठी तज्ञांची गरज असणार आहे. तेव्हाच ह्या बाबीची साध्यता शक्य आहे.

## महाराष्ट्रातील शिक्षण व तंत्रज्ञान-

नवनवीन तंत्रज्ञानाचा शिक्षणात वापर करण्यामध्ये महाराष्ट्र नेहमीच अग्रगण्य राहिला आहे. ग्रामीण भागातील शेवटच्या विद्यार्थ्यापर्यंत दर्जेदार शिक्षण पोहोचविण्यासाठी तसेच शैक्षणिक क्षेत्रातील सुधारणांसाठी जगभरातील नामांकित आयटी कंपन्यांच्या सहकार्याने राज्यात अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविल्या जात आहे. माहिती तंत्रज्ञान शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक घटकास त्यांची कार्यक्षमता, कुशलता आणि प्रभावीपणा विकसित करण्यास मदत करते. राज्यातील शिक्षण क्षेत्रात देखील त्याचा प्रभावी वापर करून तंत्रज्ञानाच्या सुयोग्य वापरास चालना देवून कोणत्याही परिस्थितीत राज्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचावे म्हणून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यामार्फत पुढीलप्रमाणे उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात आहे.

१. <u>अभ्यासमाला-</u>

कोरोना प्रादुर्भावामुळे जगात सर्वत्र बऱ्याच कालावधी करीता शाळा बंद ठेवाव्या लागल्या. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरु राहावे म्हणून “शाळा बंद पण शिक्षण सुरु” या उपक्रमांतर्गत दीक्षा ॲप वरील इयत्ता १ली ते १० वी च्या विषयानुरूप घटकांवरील लिंक्स दैनिक अभ्यासमालेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसोबत शेअर केली जाते. देशातील एकूण दीक्षा ॲप वापरापैकी ४६% विद्यार्थी एकट्या महाराष्ट्रातील आहेत. रोज सुमारे २० लाखापेक्षा जास्त विद्यार्थी,शिक्षक व पालक याचा लाभ घेत आहेत. यासाठी www.diksha.gov.in या लिंक चा उपयोग करण्यात येतो.

२. <u>शैक्षणिक दिनदर्शिका-</u>

इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी तसेच शिक्षकांसाठी मार्गदर्शक म्हणून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र यांच्यामार्फत शैक्षणिक दिनदर्शिका तयार करण्यात आलेली आहे. ज्या ठिकाणी अभ्यासमाला इंटरनेट सुविधा अभावी उपलब्ध होऊ शकत नाही अशा भागातील विद्यार्थी व शिक्षक यांच्यासाठी शैक्षणिक दिनदर्शिकेचा उपयोग मोठ्या प्रमाणात करण्यात येतो. सदरची शैक्षणिक दिनदर्शिका विद्यार्थी ,शिक्षक व पालकांना स्मार्ट पीडीएफ च्या स्वरूपामध्ये व्हाट्सअप समूहाच्या माध्यमातून पोचविण्यात आली. www.maa.ac.in या लिंकवर ती उपलब्ध आहे.

३. <u>जिओ टी.व्ही. व जिओसावन-</u>

जिओ टी.व्ही च्या माध्यमातून इयत्ता ३ री ते १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी एकुण १२ शैक्षणिक चॅनलच्या माध्यमातून शिक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात आला. तज्ञ शिक्षकांच्या तासिकांचे प्रक्षेपण केले जाते जे विद्यार्थी मोबाईलच्या माध्यमातून सुद्धा पाहू शकतात. इयत्ता १० व १२ वी चे सरासरी ५९००० विद्यार्थी या प्रक्षेपणाचा फायदा घेतात.तर ३ री ते ९ वी चे प्रक्षेपण पाहणारे सरासरी ४४ ००० विद्यार्थी आहे.


जिओसावन च्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी रेडिओवर आधारित कार्यक्रमांचे प्रक्षेपण करण्यात आले. इंग्लीश विषयाच्या विविध इयत्तांच्या एकूण ८४ श्रुतिका रेडीओद्वारे प्रक्षेपित करण्यात आल्या आहेत.

४. <u>ज्ञानगंगा</u> –

इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन ज्ञानगंगा या शैक्षणिक कार्यक्रमाच्या माध्यमातून डी डी सह्याद्री वाहिनीवर सोमवार ते शनिवार सकाळी साडेसात ते साडेबारा या वेळेत प्रसारित करण्यात आला. इयत्ता नववी ते बारावीच्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी सदरचे तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन त्यामध्ये देण्यात आले. याचा लाभ राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना झाला. त्याचप्रमाणे इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी सोमवार ते गुरुवार या कालावधीमध्ये इंग्रजीच्या विशेष तासाचे प्रक्षेपण सुद्धा डीडी सह्याद्री वाहिनीवर करण्यात आले. (DDSahyadri Channel)

५. <u>गूगल क्लासरूम</u>–

कोरोनाच्या प्रादुर्भाव मध्ये देखील विद्यार्थी व शिक्षक परस्परसंवादी रहावे त्यादृष्टीने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांच्यामार्फत गुगल फॉर एज्युकेशन यांच्या मदतीने सर्व शिक्षकांना ऑनलाइन स्वरूपामध्ये गुगल क्लासरुमचे प्रशिक्षण दिले गेले. सुरुवातीला या प्रशिक्षणासाठी राज्यातील एकूण १ लाख ३७ हजार शिक्षकांनी नाव नोंदणी केली होती. त्यापैकी ४० हजार शिक्षकांना पहिल्या टप्प्यामध्ये ऑनलाईन प्रशिक्षण दिले गेले. याअंतर्गत शिक्षकांना मोफत जी सूट आयडी उपलब्ध करून दिला त्याचा वापर शिक्षणासाठी चांगल्या प्रकारे केला जाऊ शकतो व एकूणच शिक्षण परस्परसंवादी सुरू ठेवल्या जाऊ शकते. https://google.addingdimensions.in/Home.aspx



६. **यूट्यूबचा प्रभावी वापर-**

- **गोष्टींचा शनिवार** -युनिसेफ व प्रथम संस्थेच्या मदतीने सर्व विद्यार्थ्यांसाठी श्रवणीय तसेच बोधात्मक अशा गोष्टींचे वाचन करणे तसेच विद्यार्थ्यांमधील वाचन कौशल्याच्या विकासासाठी गोष्टींचा शनिवारी या ऑनलाईन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली .ज्यामध्ये दर शनिवारी मूल्याधिष्ठित श्रवणीय व वाचनीय गोष्टींचे वाचन यूट्यूब च्या माध्यमातून करण्यात आले. https://youtu.be/Bt५EIZ५-yN४

- **मैत्री विज्ञान गणिताशी-** महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थी व शिक्षक यांना आपल्या परिसरात सहज उपलब्ध असलेल्या सामग्री मधून विविध प्रयोग व कृतींचे दिग्दर्शन करणे, प्रतिकृती बनवून त्यांचे प्रात्यक्षिक दाखवणे, वर्गामध्ये उपक्रम करण्यास प्रोत्साहित करणे तसेच विज्ञान व गणित विषयातील संकल्पना सोप्या भाषेत समजावून घेण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे व भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था (आईसर) पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञान व गणित विषयाच्या शिक्षकांसाठी मैत्री करूया विज्ञान गणिताशी या नाविन्यपूर्ण प्रयोग व कृती वर आधारित ऑनलाइन कार्यशाळाही आयोजित करण्यात आली. https://youtu.be/C३K३४BVWtQU

- **अकरावी ऑनलाइन तासिका प्रक्षेपण** - राज्यातील मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी शाखानिहाय तज्ञ शिक्षकांच्या तासिकाचे प्रक्षेपण राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांच्या यूट्यूब चैनल च्या माध्यमातून लाईव्ह तासिका घेण्यात आल्या. ह्या तासिका वेगवेगळ्या शाखा निहाय व विषय निहाय घेवून प्रत्येक विषयांचे सविस्तर मार्गदर्शन विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले. https://youtu.be.com/playlist?list=PLFJ७६Y६VBMZrLda१t२Li६XA१_ibMVqZg५

- **ऑनलाइन गाईडन्स** अँड **कौन्सेलिंग पोर्टल** - इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक व्यावसायिक अभ्यासक्रमाची माहिती ,शिष्यवृत्ती, प्रवेश परीक्षा याबाबतची माहिती उपलब्ध होण्यासाठी महा करियर पोर्टल महाराष्ट्र शासन शिक्षण विभागाने तयार केले. सदर महाकरियर पोर्टल वर विद्यार्थ्यास सुमारे ५५५ करिअर, सुमारे २१ हजार महाविद्यालय आणि संस्था सुमारे १५० विविध प्रवेश प्रक्रिया, १२०० विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती यांची माहिती उपलब्ध करून देण्यात आली. इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना या संकेतस्थळावर जाऊन शाळेने दिलेला सरल आयडी व पासवर्ड १२३४ ५६ चा वापर करून महा करियर पोर्टल चा करिअर विषयक माहिती घेण्यासाठी उपयोग करता येतो. https://mahacareerportal.com

- **इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांचे शंकासमाधान-** इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन स्वरूपामध्ये परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन तसेच विद्यार्थ्यांचे शंका समाधान करणे व विषयाच्या बाबतीत आवश्यक पूरक मार्गदर्शन करणे या उद्देशाने SCERT च्या यूट्यूब चैनल वरून सत्र प्रसारित केले जातात. याद्वारे राज्यभरातील विद्यार्थी आपल्या परीक्षा संदर्भातील समस्या व शंका सोडवीत असतात. http://www.youtube.com/watch?v=trpfAQvfEmk&list=PLFJ७६Y६VBMZrK४fjOxYo-०A३INC२F४Rt

- **खेळणी निर्मिती ऑनलाईन उद्बोधन कार्यशाळा**- राष्ट्रीय स्तरावरून होणाऱ्या Toy Fair अनुषंगाने राज्यस्तरावर तज्ञांच्या मार्फत शिक्षकांना विद्यार्थ्यांसाठी खेळणी निर्मिती करण्याची उद्बोधन कार्यशाळा यूट्यूबच्या माध्यमातून घेण्यात आली.
  http://www.youtube.com/watch?v=५XrYG३EDu६Y&list=PLFJ७६Y६VBMZrnT५WlhEYhNNlvm६०Uf९TQ

उपरोक्त सर्व उपक्रम युट्यूब च्या माध्यमातून कार्यान्वित करण्यात आले होते.

ऑनलाईन शिक्षक विकास मंच, टीचर टॉक, पॅरेन्ट टॉक, स्वाध्याय, शिकू आनंदे, शैक्षणिक नेतृत्व कार्यक्रम असे बहुविध विषयाशी संबंधित विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक व पर्यवेक्षकीय यंत्रणा यांना उपयुक्त असणारे उपक्रम प्रभावीपणे तंत्रज्ञानाच्या मदतीने महाराष्ट्रात राबविल्या जात आहे. त्याचे यशस्वी परिणाम सुद्धा समोर येवू लागले आहेत. कोविड -१९ मध्ये शाळा बंद होत्या पण शालेय शिक्षण विभागाच्या निरंतर प्रयत्नातून विद्यार्थ्यांचे शिक्षण मात्र सुरूच राहिले. या शाळा बंदच्या दीर्घ कालावधीत विद्यार्थ्यांमध्ये ज्या अध्ययन उणीवा निर्माण होण्याची शक्यता होती त्याला काही प्रमाणात प्रतिबंध घातला गेला. शिक्षण विभागाच्या या प्रयत्नांना शिक्षक,मुख्याध्यापक व पर्यवेक्षकीय यंत्रणा यांनी सुद्धा भरभरून प्रतिसाद दिला व शक्य त्या मार्गाने मुलांपर्यंत शिक्षण पोहचवत राहण्यासाठी ते प्रयत्न करीत राहिले. या सर्वांचा परिणाम म्हणजे काही शाळेतील विद्यार्थी या तंत्रज्ञानाच्या प्रभावाने असे शिकते झाले की कोविड काळातील लॉकडाऊन त्यांच्यासाठी शिक्षणाची नवी संधी घेवून आला आणि तंत्रज्ञानाची नवे दरवाजे त्यांच्यासाठी उघडे करून शिकण्याच्या प्रक्रियेला गती प्राप्त झाली..

**यशोगाथा-**
**शाळेचे नाव -जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,**
**आसर अल्ली तालुका सिरोंचा ,जिल्हा गडचिरोली**
**श्री. खुर्शीद कुतुबुद्दीन शेख**



माझ्या घरची परिस्थिती जेमतेम होती. त्यात आईच्या आकस्मिक निधनाने मी संपूर्ण खचून गेलो होतो. परिस्थिती बेताची असल्यामुळे बीएससी करून पुढे शिकण्याचा विचार बाजूला सारून नोकरी मिळेल या हेतूने

डीएड करण्याचा निर्णय घेतला. सन १९९५ ला डीएड झाल्यानंतर जळगाव जिल्ह्यातील एका खासगी संस्थेत शिक्षक म्हणून रुजू झालो. चित्रकला, नृत्य, नाट्य, गायन, वादन व गीतलेखन इत्यादीची शालेय जीवनापासूनच मला आवड होती. या कलांचा उपयोग करून विद्यार्थ्यांची शिकण्याची अभिरुची वाढवून त्यांना गुणवत्ता विकास करता येतो याचा मला विश्वास होता. पण त्या खासगी संस्थेला अनुदान नसल्याने कोणतेही वेतन मला मिळत नव्हते. त्याचवर्षी जिल्हा परिषदेच्या जागा निघाल्या. मी गडचिरोली जिल्ह्यातील अतिशय दुर्गम नक्षलग्रस्त समजल्या जाणाऱ्या सिरोंचा तालुक्यातील झिंगानूर या आदिवासी व माडिया भाषिक गावातील प्राथमिक शाळेत १७ सप्टेंबर १९९६ रोजी शिक्षक म्हणून रुजू झालो. माझ्या शिक्षकी जीवनातील ही खूप मोठी संघर्षमय स्थिती होती. पण नक्षलवादी, आदिवासी गावात आव्हान स्वीकारून विपरीत परिस्थितीत कार्य करून शाळेचा व विद्यार्थ्यांचा विकास करायचा व स्व जिल्ह्यात परत जायचे हे दोन पर्याय माझ्यासमोर होते. परंतु पळ काढण्यापेक्षा आव्हानाशी लढण्याचा निर्णय मी घेतला. माझ्या शिक्षकी जीवनात किंवा सेवेतील हे सर्वात मोठे आव्हान होते. ते मी स्वीकारले व कामाला सुरुवात केली.

भाषा, परिसर व संस्कृती सर्व काही माझ्यासाठी नवीन होते. त्यामुळे माझ्यामध्ये व विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड भाषिक दरी निर्माण झाली होती. विद्यार्थी शाळेपासून, माझ्यापासून दूर होते. याशिवाय अनेक समस्या सोबतीला होत्याच. १) माडिया भाषिक विद्यार्थी व पालक त्यामुळे संवादाचा अभाव. २) पालकांची शिक्षणाविषयीची अनास्था ३) तालुक्यापासून ५५ किलोमीटर दूर जंगलात वसलेले गाव, त्यामुळे आधुनिक जगाशी काही संपर्क नव्हता ४) गावात विद्युत होती परंतु एक आठवडा सुरु तर एक महिना ती बंद असायची. ५) रात्री होणाऱ्या नक्षल गीताने गाव व विद्यार्थी प्रेरित झालेले होते ६) शाळेतील मुले पालकांसोबत जंगलात शिकारीला भटकत होती. ७) उदरनिर्वाहाच्या साधनाचा अभाव त्यामुळे अत्यंत गरिबी होती. मुलांना पण कामाला नेण्यात यायचे.




ज्या जंगलात नक्षलींचे लाल फलक लागायचे तिथे शिक्षणाचा फलक लावणे हे एक मोठे आव्हान होते. परंतु माझ्यासाठी व शिक्षण प्रक्रियेसाठी एक सकारात्मक भाग म्हणजे शिक्षक व शाळा यांना नक्षलवाद्यांचा कधीच विरोध राहिला नाही. त्याचा फायदा माझ्या आत्मविश्वासाला झाला व योग्य नियोजन करून जोमाने विद्यार्थ्यांना शाळेत आणण्याच्या कामाला मी लागलो. सर्वात प्रथम भाषेची अडचण होती. कारण विद्यार्थी आणि पालकांना विश्वासात घ्यायचे असेल तर त्यांची भाषा अवगत करण्याशिवाय माझ्याकडे पर्यायच नव्हता. मी जवळच्या शाळेतील एका शिक्षकाची मदत घेऊन माडिया भाषा शिकू लागलो जिद्द आणि चिकाटीने मी लवकरच ही भाषा आत्मसात केली. काही विद्यार्थी शाळेचा मार्ग धरू लागली होतीच इतरही विद्यार्थ्यांना आणण्यासाठी हे विद्यार्थी सेतू ठरू लागली. शिक्षणाबद्दल व शाळेबद्दल अनास्था असलेल्या विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण एकमेव मार्ग

होता आणि त्यात माझा हातखंडा होता. नृत्य, नाट्य, अभिनय या माध्यमातून मिळणारे शिक्षण हे प्राथमिकस्तराच्या विद्यार्थ्यांसाठी आनंद पर्वच होते. मला बघून पळणारी मुले आता जवळ येऊ लागली त्यांची आणि माझी मैत्री घट्ट होत गेली. जंगलात असलेल्या विद्यार्थ्यांना जंगलातच "जंगल क्लासरुमच्या" माध्यमातून शिकविणे हा एक अनोखा अनुभव होता. माझ्यासाठी प्रत्येक अडचण ही एक नवीन शिकण्याची संधी होती.

त्याच दरम्यान मला शाळेच्या एका लाकडी पेटीत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्या मार्फत प्रकाशित केले जाणारे जीवन शिक्षण मासिक सापडले. ती माझी आणि जीवन शिक्षण मासिकाची पहिलीच भेट होती. प्रत्येक अंकात शिक्षकांच्या प्रेरणादायी उपक्रमांना व लेखांना वाचू लागलो तेव्हा मला जाणवले की विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मीच एकटा संघर्ष करत नाही तर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात माझ्यासारखे अनेक शिक्षक विपरीत परिस्थितीमध्येही विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या शिक्षणासाठी धडपडत आहे. या मासिकाने मला एक नवीन शैक्षणिक दृष्टी दिली नवनवीन संकल्पनांना आकार दिला आहे. अतिशय दुर्गम भागात विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कार्याचा जीवन शिक्षण मासिकामध्ये माझा आलेले लेख हा संपूर्ण सिरोंचा तालुक्यासाठी अभिमानाची बाब होती. त्यासाठी एक धडपडणारा शिक्षक म्हणून पहिल्यांदाच गटशिक्षणाधिकारी यांच्या हस्ते माझा सत्कार करण्यात आला. जीवन शिक्षण मासिकाने नावाप्रमाणेच माझ्या जीवनात बदल घडवून आणले, जे माझ्या शाळेसाठी व विद्यार्थ्यांसाठी हिताचे ठरले. या शाळेमध्ये मी इंग्रजी परिपाठ, इंद्रधनुष्य बाहुलीनाट्य मंच, पाढ्याच्या दुनियेत, बाल साप्ताहिक,चला बोलूया!, माझी भाषा माझी आई ,अभिनयातून शैक्षणिक अभियानाकडे, माझे हस्ताक्षर बघाना!, गणिताचा बाजार यासारखे विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात केली आणि या सर्वांचा परिणाम विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल दिसून येऊ लागले. सर्वात प्रथम म्हणजे विद्यार्थ्यांची पटसंख्या व उपस्थिती वाढली. जिथे पटसंख्या ४० ते ६० असायची तिथे ३५०च्या वर विद्यार्थी संख्या झाली. १ ली ते चौथी पर्यंत ची असलेली शाळा १ ली ते ७ वी पर्यंत झाली. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये बदल झाला व त्यांच्यामध्ये शिकण्याची आवड निर्माण झाली. शाळेचे विद्यार्थी क्रीडा सांस्कृतीक स्तरावर आपली छाप उमटवू लागले. शिष्यवृत्ती व विद्यानिकेतन साठी पात्र होऊ लागले. १९९६ ते २००० या कालावधीत मला मिळालेले हे यश माझ्या पुढच्या कार्यासाठी प्रेरणा देणारे ,मार्गदर्शन करणारे होते.

पुढे माझी बदली अहेरी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा वेलगुर येथे झाली. कार्यानुभवाच्या माध्यमातून श्रमातून कमवा व शिकवा हा प्रकल्प सुरू केला. त्यातून विद्यार्थी दंतमंजन, सुगंधित केस तेल इत्यादी वस्तू तयार करून विक्री करू लागले. शाळेत बाल वस्तू विक्री केंद्र तयार करून विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक शिक्षणाची आवड निर्माण केली. क्रीडा समाचार या बालकांच्या द्वारे हस्तलिखित साप्ताहिकातून गावात साप्ताहिक वर्तमानपत्र सुरू केले. गुणवत्ता विकास कार्यक्रमात विभागीय कार्य स्तरावर शाळेने प्रथम क्रमांक पटकावला. या शाळेनेही २००१ ते २००७ या सात वर्षाच्या कालावधीत विविध क्षेत्रात भरपूर यश मिळवले. या यशाने माझ्या कार्याला अधिक गती व नाविन्यता आणली. पुन्हा एकदा अहेरी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मैलाराम या दुर्गम भागातील शाळेत सेवा करण्याची संधी मिळाली २००६ ते २०११ या कालावधीत या शाळेतील गणितीय बाग हा तालुक्यातील आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला होता. प्रत्येक शाळा ही माझ्यासाठी प्रेरणा बनत होती.

त्याच दरम्यान विद्यार्थ्यांची वैचारिक, सामाजिक व शैक्षणिक गुणवत्ता वाढवायची असेल तर स्वतःच्या शैक्षणिक पात्रतेत वाढ झालीच पाहिजे या इंग्रजी, समाजशास्त्र, मराठी या विषयात पदवीत्तर पदवी, बी.एड., एम.एड., ॲडव्हान्स डिप्लोमा कोर्स इन एज्युकेशन टेक्नॉलॉजी या पदव्या मुक्त विद्यापीठातून संपादन करून


स्वतःही भविष्यातील अपडेटेड शिक्षक म्हणून मी सज्ज केले. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्र शाळा आसरअल्ली , तालुका सिरोंचा, येथे बदली झाली. तेलंगणा व छत्तीसगडच्या सीमेवर असलेली तेलुगु भाषा व संस्कृतीने प्रभावित असलेली ही शाळा. पटसंख्या ४२ होती पण शाळा बंद होण्याच्या मार्गावर कारण रटाळ, नीरस वातावरण व शंभर टक्के तेलुगू भाषिक विद्यार्थी असल्याने मराठी भाषिक शाळेत मराठी, हिंदी व इंग्रजी पासून तर खूप दूर गेलेले. शाळेत दोन शिक्षक फक्त निराशेच्या भावनेतून कार्य करणारे . त्यांनी घोषितच केले होते की तेलुगु चा प्रभाव असल्याने या विद्यार्थ्यांना मराठी भाषा किंवा पुस्तक शिकविणे अशक्यच आहे. मला तालुक्याच्या ठिकाणी मॉडेल स्कूलमध्ये प्रतिनियुक्तीची संधी त्याचवेळी आलीपरंतु या शाळेतील ४२ विद्यार्थ्यांचे निरागस चेहरे माझ्या मनाला विचलित करीत होते. त्यामुळे मी प्रतिनियुक्ती नाकारली व माझ्या विद्यार्थ्यांना शिक्षणप्रेमी बनविण्यास सज्ज झालो.

भाषा विकासासाठी तसेच इतर शैक्षणिक समस्यांवरील उपाय शोधण्यासाठी शैक्षणिक उपक्रम संशोधन केंद्र व काही उपक्रम तातडीने हाती घेण्यात आले. शाळेच्या इमारतीला रंगरंगोटी करून भौतिक सुविधा लोकसहभागातून निर्माण करून शाळेला शिक्षणाचे आनंदवन बनवण्यात आले. गावातील आकर्षणाचे केंद्र माझी शाळा बनली. विविध तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शाळेला डिजिटल केले. लॅपटॉप ,संगणक, स्मार्ट बोर्ड यासारख्या वस्तू समाज सहभागातून व इतर शिक्षणप्रेमी व्यक्तींना भेटून शाळेत जमा करायला सुरुवात केली. शाळा डिजिटल झाल्यामुळे विद्यार्थ्यांना पण त्याची आवड निर्माण झाली आणि त्याचा परिणाम त्यांच्या भाषा विकासावर दिसू लागला.पुढील उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तत लक्षणीय बदल जाणवायला लागला.

१. **तेलगु ते ईंग्रजी ऑनलॉईन व्हिडिओची डिक्शनरी** - माझ्या तेलगु भाषीक विद्यार्थ्यांना ईंग्रजी गंमतीदार पध्दतीने शिकता यावी या करीता तंत्रज्ञानाचा वापर करून ही डिक्शनरी त्यांना उपलब्ध करून दिली. विद्यार्थी आनंदाने ह्या व्हिडिओ डिक्शनरी च्या माध्यमातून इंग्रजी कडे सहज आकर्षित झाली.
२. **शाळेच्या वेबसाईटची निर्मिती** - ह्या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी व पालक शाळेच्या विविध उपक्रमाची माहिती जाणून घेऊ लागले. विद्यार्थी व पालक तंत्रज्ञानाचा वापर करुन शाळेच्या उपक्रमात सहभागी होऊ लागले https://zpupdigitalschoolasarallicom-७६.webself.net
३. **पेन पाल स्कूल अँप चा वापर** - ह्या अँपच्या वापराने विद्यार्थी ईतर देशातील विद्यार्थ्यांशी आपले शैक्षणिक उपक्रम व संवाद करू लागले. कोरोना काळात अनेक देशोदेशीचे मित्र ह्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी बनविले.
४. **मी रिपोर्टर** ZP TV - ह्या उपक्रमाच्या माध्यमातून शाळेच्याच प्रसार माध्यमाची (School Media ) निर्मिती केली त्यामुळे विद्यार्थी बोलके होऊन आपले विचार फेसबुक, ईस्टाग्राम, युट्यूब वर मांडू लागले . विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञानात्मक समाज माध्यमाचा वापर करण्याचे कौशल्य विकसित झाले .
५. **व्हर्च्युअल क्लासरुम** - ह्या क्लासरुमच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी भारत, महाराष्ट्र, तसेच जगातील प्रसिद्ध स्थळांचे दर्शन केले.
६. UNESCO associate school Network - या माध्यमातून विद्यार्थ्यांनी कोविड काळात आपल्या शाळेतील उपक्रमांना ईतर देशातील उपक्रमासोबत सहभागी केले.
७. Jollywood - या अभिनय कौशल्यावर आधारित शिक्षण पद्धतीचा वापर सर्वात प्रभावी ठरला. आपल्या शाळेतील विविध समस्यांना लघुपटाच्या माध्यमातून मांडून विद्यार्थ्यांमध्ये असलेले न्यूनगंड दूर करून त्यांची अध्ययनाची गती वाढली.

८. कोविड मधली ऑनलाईन मस्ती की पाठशाला, शिकु आनंदे ह्या शाळेत विद्यार्थ्यांना सहभागी केले. माझ्या विद्यार्थ्यांनी कोविडकाळात शाळेबाहेरची शाळा, आकाशवाणी (रेडीओ ) कार्यक्रमात सहभाग घेतला.




आज विद्यार्थी लॅपटॉप, टॅब, एन्डआईड मोबाईल, प्रोजेक्टर, सहज हाताळुन शैक्षणिक व्हिडिओची निर्मीती करु लागले आहेत . व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ते आवडीने शिकत आहे...आधुनिक तंत्रज्ञानामुळे विद्यार्थी तंत्रज्ञानामध्ये गतिमान होऊ लागले. विद्यार्थ्यांचा भाषिक विकास होऊन त्यांचा आत्मविश्वास वाढीस लागला. क्षेत्रभेटीचे आयोजन करून विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी बोलण्याची संधी मिळवून दिली आणि त्यामुळे प्रमाण भाषेमध्ये संवाद साधण्याचा आत्मविश्वास विद्यार्थ्यांना मिळाला. तर दुर्गम समजली जाणारी ही शाळा आधुनिक जगाशी जुळवून घेऊन प्रगती करू लागली. या शाळेतून विद्यार्थी भाषिक भीतीमुळे पुस्तकांपासून दूर जात होते तिथे लोकसहभागातून तीन हजार पुस्तकांचे ग्रंथालय आहे व विद्यार्थी त्या ग्रंथालयाचा आनंदाने उपयोग करत आहे. यासारखे विविध उपक्रमांमुळे आज शाळा जिवंत झाली असून शाळेची पटसंख्या दोनशेच्या वर गेलेली आहे. विविध स्पर्धा परीक्षा खेळ कलात्मक स्पर्धा यात विद्यार्थ्यांना यश मिळतच आहे परंतु शिष्यवृत्ती, नवोदया मध्ये सुद्धा विद्यार्थ्यांची निवड होत आहे. भाषा ही समस्या मुळातच नव्हती फक्त अभाव होता विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचा. समस्याही संशोधना पेक्षा मोठी असू शकत नाही म्हणून शिक्षकाला संशोधक वृत्ती , विद्यार्थी व शाळेविषयी प्रेम, आवड असणे गरजेचे आहे महत्त्वाच म्हणजे जिवंत शाळेतच जिवंत शिक्षकांमुळे जिवंत विद्यार्थी शिकू शकतात हे मागील अनेक वर्षापासून मी अनुभवलेले आहे.



**चिंतनात्मक प्रश्न-**

१) श्री खुर्शीद शेख सरांना गडचिरोली जिल्ह्यात काम करतांना आलेल्या आव्हानांची यादी करा.

२) श्री खुर्शीद शेख सरांची विद्यार्थ्या सोबत घट्ट मैत्री का झाली ?

३) श्री खुर्शीद शेख सरांनी मुलांना तंत्रस्नेही बनविण्यासाठी काय उपाययोजना केली?

**विचार करूया,चर्चा करुया-**

१. तुमच्या शाळेतील शिक्षक शाळा बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांचा ऑनलाईन वर्ग घेतात. पण काही विद्यार्थ्यांनी या वेळी चुकीच्या वेबसाईटचा वापर सुरु केला हे काही पालकांच्या लक्षात आले. त्यामुळे सर्व पालकांनी ऑनलाईन अभ्यासाला विरोध करणे सुरु केला. विद्यार्थ्यांना मोबाइल देणेच बंद केले तर अशा वेळी तुम्ही मुख्याध्यापक म्हणून काय कराल.

२. अतिदुर्गम भागात असलेल्या शाळेचे मुख्याध्यापक म्हणून तुम्ही कार्यरत आहात, अशा शाळेत तुम्ही तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराल ?

**मोड्यूलची शालेय नेतृत्वाच्या दृष्टिकोनातून उपयुक्तता-**

शिक्षक प्रशिक्षणामध्ये आजपर्यंत अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक कौशल्य निर्मिती मध्ये शालेय नेतृत्वाची भूमिका या बद्दल कधी विचार करण्याची गरजच भासली नाही. कारण आज पर्यत जगाच्या इतिहासात जवळ जवळ १८ महिने सर्व शाळा बंद ठेवाव्या लागल्यात अशी परिस्थितीच उद्भवलेली नव्हती . जगाचे सर्व व्यवहार बंद करून कित्येक महिने सर्वांना घरातच राहावे लागेल या बद्दल कधीच कल्पनाच केली नव्हती . पण गेल्या वर्षभरात सर्वांनी हे जगणे अनुभवलेले आहे. त्यामुळे भविष्यात पुन्हा अशी परिस्थिती उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशावेळी शाळा बंद कराव्या लागल्या मुळे मुलांचे शिक्षण थांबू नये, विविध मार्गांनी, विविध माध्यमांतून ते सुरु राहावे यासाठी अनेक पर्याय शिक्षकांच्या समोर असावे म्हणून या मोड्यूलची गरज निर्माण झाली आहे. तंत्रज्ञानाच्या मदतीने शहरी भागातील मुलांच्या सोबत ग्रामीण आणि अतिदुर्गम भागातील मुले सुद्धा योग्य त्या नियोजनामुळे व प्रभावी नेतृत्वामुळे उत्तमपणे तांत्रिक कौशल्य प्राप्त करून आपले अध्ययन करू शकतात हे या मोड्यूल च्या अभ्यासाने तुमच्या लक्षात आलेच असेल. सदर मोड्यूलचा उपयोग अशा प्रकारच्या कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या नेतृत्वाला तर होईलच पण इतरही कार्यक्षेत्रातील

शैक्षणिक नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींसाठी निश्चितच उपयुक्त ठरणार आहे.या मोड्यूल मूळे पुढील परिणाम साधता येतील

- ✓ शिक्षण हक्क कायदा २००९ ची यशस्वी अंमलबजावणी.
- ✓ प्रत्येक विद्यार्थ्यांचा शिक्षण हक्क नैसर्गिक, सामाजिक, व आर्थिक परिस्थितीने बाधित होऊ न देता शिक्षणप्रक्रिया सुरू ठेवणे.
- ✓ नैसर्गिकआव्हान असणाऱ्या क्षेत्रांसंबंधित येणाऱ्या समस्यांचे पृथक्करण,विश्लेषण करून समस्येची सोडवणूक.
- ✓ OUT OF THE BOX जाऊन काम करण्याची प्रेरणा .

**समारोप-**

नैसर्गिक,सामाजिक,भौतिक परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी त्यावर मात करण्याचे सामर्थ्य सक्षम शालेय नेतृत्वाजवळ असते. अपेक्षित यश मिळविण्यासाठी असा शालेय नेता प्रतिकूल परिस्थितीने खचून न जाता, आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेतो, त्यांना विश्वासात घेऊन, सतत प्रेरणा - प्रोत्साहन देत कार्यप्रवण ठेवतो. विद्यार्थ्यांना शाळेत टिकवून, शिकण्याची गोडी लावण्यासाठी शालेय नेता स्वतःच्या सर्जनशीलते चा विकास करून मुलांना कोणत्याही परीस्थितीत शिकते ठेवतो. तसेच पालक व समाजाच्या समस्या जाणीवपूर्वक समजून घेऊन त्यांना मार्गदर्शन करीत,मदत करीत समाजात शाळा व शिक्षकांप्रति विश्वास व जिव्हाळ्याचे संबंध दृढ करतो. त्यांच्या व्यक्तिमत्वाला योग्य आकार देण्यासाठी नावीन्यपूर्ण, विविधांगी अध्ययन अनुभव मिळावेत यासाठी आग्रही असतो. त्यांना प्रगतीच्या दिशेने घेवून जाण्यासाठी सतत धडपडत असतो. आणि जिद्दीने सतत स्वतः कृतिशील राहून शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रगतीचे आपले ध्येय साध्य करण्यात यशस्वी होतो.आपल्या राज्यात प्रतिकूल परिस्थिती यशस्वीपणे शिक्षणाचे कार्य करणारे अनेक मुख्याध्यापक आहेत ज्यांच्या कार्याचे यश त्यांच्या कार्याची साक्ष देतात.

**संदर्भ सूची -**

१. शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम पूरक वाचन साहित्य, जानेवारी २०१८ संचालक महाराष्ट्र विद्या प्राधिकरण पुणे
२. निष्ठा, मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या समग्र प्रगतीसाठी राष्ट्रीय पुढाकार, डिसेंबर २०१९, संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे.
३. राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०
४. www.diksha.gov.in
५. https://google.addingdimensions.in/Home.aspx
६. https://youtu.be/Bt५EIZ५-yN४
७. https://youtu.be/C३K३४BVWtQU
८. https://youtu.be.com/playlist?list=PLFJ७६Y६VBMZrLda१t२Li६XA१_ibMVqZg५
९. https://mahacareerportal.com

१०. http://www.youtube.com/watch?v=trpfAQvfEmk&list=PLFJ७६Y६VBMZrK४fjOxYo-०A३INC२F४Rt
११. http://www.youtube.com/watch?v=५XrYG३EDu६Y&list=PLFJ७६Y६VBMZrnT५WlhEYhNNlvm६०Uf९TQ
१२. https://zpupdigitalschoolasarallicom-७६.webself.net
१३. https://youtube.com/channel/UCen८THPZBBYRB०d८qsR९७UQ
१४. https://kartavyasadhana.in/view-article/in-conversation-with-national-teacher-award-२०२१-winner-khurshid-shaikh

**मोड्यूल विकसक**
डॉ.किरण धांडे
उपविभाग प्रमुख
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

**समन्वयन**
डॉ.ज्योती कुलकर्णी
समन्वयक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद

**मार्गदर्शक**
श्री.रमाकांत काठमोरे
संचालक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद